MHWS080007482019

## रे.मु.नं. ६४/२०१९ मधील नि. ३६ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ०१ सखाराम पुंजाजी तुरुकमाने व प्रतिवादी क्र.०३ कौशल्या भगवान चाटसे मयत झाल्याने त्यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यास जो विलंब झाला तो माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र. ०१ सखाराम पुंजाजी तुरुकमाने हे दिनांक ०५.०१.२०२४ व प्रतिवादी क्र.०३ कौशल्या भगवान चाटसे हया दिनांक ०८.०७.२०२२ रोजी मयत झाल्या असून त्याबाबतची माहिती उशीराने वादीस समजली. वादी हे परगावी राहत असून वादी क्र.०१ ही वयस्कर व आजारी महिला आहे. वादी क्र.०२ हे खाजगी नोकरीत असून वादी क्र.०३ हे शिक्षण घेतात त्यामुळे वादींना प्रतिवादी क्र. ०१ व ०३ मयत झाल्याची माहिती मुदतीत समजली नाही. प्रतिवादी क्र.०२ यांनी मयत प्रतिवादी क्र.०१ व ०२ नातेवाईक असूनही त्याचे मृत्यूबाबत माहिती कळवली नाही. प्रतिवादी क्र.०२ यांनी दिनांक २५.०६.२०२४ रोजी दिलेल्या माहितीनुसार प्रतिवादी क्र.०१ व ०३ मयत झाल्याचे वादींना समजले. त्यानंतर वादींनी मयतांचे वारसांबाबत माहिती घेउन सदरचा अर्ज दाखल केलेला असून अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब वर नमूद कारणाकरीता माफ करावा अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी तर्फे म्हणणे मागवणेत आले असता प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन नैसर्गिक न्यायतत्वानुसार अर्ज मंजूर करण्यास हरकत नसल्याचे नमूद केले.

४. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुतचा दावा वाटप होउन पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीत, वादीने दिलेला अर्ज व

त्याबाबत कायदेशीर बाब पाहता, दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २२ नियम ०४ प्रमाणे मयत प्रतिवादी क्र. ०१ व ०३ चे वारस सदर व्यक्ती मयत झाल्यापासून ९० दिवसांचे आत अर्ज सादर करुन अभिलेखावर घेणे आवश्यक असते. वादीने सदरचा अर्ज दि. ०२/०७/२०२४ प्रतिवादी क्र. ०१ सखाराम पुंजाजी तुरुकमाने व प्रतिवादी क्र.०३ कौशल्या भगवान चाटसरोजी दाखल केलेला आहे. परंतु असे जरी असले तरी, वादींना प्रतिवादी क्र. ०१ व ०३ यांचे मृत्युबाबत उशीराने समजल्याने व त्यानंतर विलंबाने वारसाबाबतची माहिती प्राप्त झाल्यामुळे प्रतिवादी क्र. ०१ व ०३ चे वारसांना रेकॉर्डवर आणणेस उशीर झाल्याचे समजते. मयत प्रतिवादी क्र. ०१ व ०३ यांची मृत्यु प्रमाणपत्रे अनुक्रमे नि.क्र. ३१ व ३५ चे कागदयादी सोबत दाखल केलेली आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत सदर अर्जात नमुद केलेली परिस्थिती व कायदेशीर बाब या सर्व बाबी सारासार न्यायबुध्दीने विचारात घेता सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्याय हक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही. उलटपक्षी, उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन, प्रतिवादी क्र. ०१ व ०३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेल्या विलंबाबाबत ठरावीक दंड आकारून अर्ज मंजुर करणे आवश्यक असलेच्या निष्कर्षाप्रत येवुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वादीने दिलेला प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. ३६ प्रतिवादी यांना एकूण दंड र.रू. २००/— देण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

स्वा/—

(पी. व्ही. सपकाळ)

दिनांक — ०२/०७/२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

MHWS080007482019

## रे.मु.नं. ६४/२०१९ मधील नि. क्र. ३७ वरील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ०४ सह आदेश ६ नियम १७ प्रमाणे प्रतिवादी क्र. ०१ सखाराम पुंजाजी तुरुकमाने व प्रतिवादी क्र.०३ कौशल्या भगवान चाटसे यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना दावे अर्जात सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीच्या अर्जातील कथानानुसार, प्रतिवादी क्र. ०१ सखाराम पुंजाजी तुरुकमाने हे दिनांक ०५.०१.२०२४ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे १) मिलींद सखाराम तुरुकमाने (मयत), १(अ) लक्ष्मी मिलींद तुरुकमाने, १(ब) राहूल मिलींद तुरुकमाने, २) गौतम उर्फ पवन सखाराम तुरुकमाने, ३) रविंद्र सखाराम तुरुकमाने, ४) लक्ष्मी सखाराम तुरुकमाने, ५) सरस्वती सुमीत वाठोरे असे कायदेशीर वारस असून त्यांना अभिलेखावर घेणे महत्वाचे आहे. तसेच प्रतिवादी क्र.०३ कौशल्या भगवान चाटसे हया दिनांक ०८.०७.२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे ३(अ) किरणकुमार भगवान चाटसे, ३(ब) प्रभाकर भगवान चाटसे असे कायदेशीर वारस असून त्यांना अभिलेखावर घेणे महत्वाचे असल्याने अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**३.** सदर अर्जावर प्रतिवादी तर्फे म्हणणे मागवणेत आले असता प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन नैसर्गिक न्यायतत्वानुसार मयत प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांचे वारस दाव्यातील गुंतागुंत टाळण्याकरिता रेकॉर्डवर घेण्याबाबत योग्य तो आदेश करण्यास हरकत नसल्याचे नमूद केले.

**४.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुत दावा हा वाटप होउन पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. परंतु दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना

प्रतिवादी क्र.०१ व ०३ हे अनुक्रमे दिनांक ०५.०१.२०२४ व ०८.०७.२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादीने सदरचा अर्ज दि. ०२/०७/२०२४ रोजी दाखल केलेला दिसतो. परंतु असे जरी असले तरी, वादीस प्रतिवादी क्र.०१ व ०३ चे मृत्युबाबत उशीराने माहिती झाल्याने व वारसांबाबतची माहिती मुदतीत न मिळाल्याने वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झाल्याचे दिसून येते. मयत प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांचे मृत्यु दाखले अनुक्रमे कागदयादी नि. क्र. ३१ व ३५ सोबत दाखल केलेले आहेत. सबब, अशा परिस्थितीत मयत प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांचे कायदेशीर वारसांना दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २२ नियम ०४ प्रमाणे दावा चालविण्याचा अधिकार टिकून रहात असल्याने प्रतिवादी क्र.०१ व ०३ यांचे नाव दावे अर्जातून कमी करुन त्यांच्या कायदेशीर वारसांना सामील करुन त्याप्रमाणे दुरुस्ती दावे अर्जात करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत सदर दुरूस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्यायहक्कावर कोणत्याही प्रकारे गदा येणार नाही अथवा दाव्याचे मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. उलटपक्षी, उभय पक्षकारांमधील खरा वाद अंतिमत: न्यायनिर्णीत करणे सोईचे होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** वादीचा सदरचा अर्ज निशाणी ३७ मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादींना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर अर्जाप्रमाणे १४ दिवसांचे आत अथवा पुढील तारखेपर्यंत दावे अर्जात मयत प्रतिवादी क्र.०१ व ०३ चे वारसांबाबत आवश्यक ती दुरूस्ती करावी व दावा दुरुस्ती प्रत याकामी सादर करावी.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

स्वा/—
(पी. व्ही. सपकाळ)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
रिसोड

दिनांक — ०२/०७/२०२४

## <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | हर्षाली अ. उचाडे |
| निकाल तारीख | : | ०२/०७/२०२४ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०२/०७/२०२४ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | ०२/०७/२०२४ |